# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म.गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन ( पूर्व ).कुळगांव, पिन - ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई-मेल : - coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट :- kbmc.gov.in.

जा.क्र./कुबनप/विद्युत/१८/२०२६-२७ दिनांक०६/०५/२०२६

## जाहिर ई-निविदा सुचना क्र. ०२ /२०२६-२७

कुळगांव-बदलापूर नगरपरिषद, जिल्हा-ठाणे यांजकडून खालील कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नोंदणीकृत विद्युत सल्लागारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक निविदाकाराने सदरच्या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम रु. (GST सह ) | बयाणा रक्कम रु. (१%) | ई-निविदा फार्म फी रु. (GST सह) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील बदलापूर नगरपरिषदेच्या नविन प्रशासकिय इमारतीवर ऑनग्रीड सोलार पॉवर सिस्टिम बसविणे. (अपारंपारिक ऊर्जा विकास योजना - शासन हिस्सा ७५% व नपा हिस्सा २५%) | १,६४,३२,७६४/- | १,६५,०००/- | १,१८०/- | बारा महीने |

➢ **सदर निविदेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.**

१. ई-निविदा संच डाऊनलोड (निविदा विक्री व स्विकृती) करण्याच्या कालावधी दि.०८/०५/२०२६ ते दि.२२/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा राहील.

२. निविदा पुर्व बैठक (रु.१.५० कोटी वरील कामांसाठी) नगरपरिषद कार्यालयात दि.१२/०५/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा राहील.

३. निविदाधारकांनी ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दि.२२/०५/२०२६ दुपारी ३.०० पर्यंत राहील.

४. मा.मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे कार्यालयात दि.२५/०५/ २०२६ रोजी दुपारी ३.०० नंतर शक्य झाल्यास तांत्रिक (कागदपत्र) लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल, त्यानंतर पात्र निविदाधारंकाचा आर्थिक बोलीचा (दर) लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

➤ **ई-निविदा भरण्याच्या अटी व शर्ती खाली नमुद केल्याप्रमाणे राहतील.**

१. सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा अन्य सक्षम खात्याचे नोंदणी प्रमाणपत्र, विद्युत अनुज्ञाप्ती, आयकर, पॅन, GST तसेच कामगार भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र, वरीलप्रमाणे कामे केल्याचा दाखला / प्रमाणपत्र आवश्यक.

२. निविदाधारकाने शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा फॉर्म फी, इसारा रक्कम व ई-निविदा online सादर करणे बंधनकारक आहे.

३. उपरोक्त कामांकरिता निविदा सादर करताना सर्व (GST व इतर) करासहित निविदा भरावी.

४. महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.सीएटी/२०१८/प्र.क्र.१२७/इमा-२ दि. १२/०४/२०१८ अन्वये मंजूर निविदाधारकाने नगरपरिषदेने पुरविलेल्या नमुन्यात रक्कम रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit) देणे बंधनकारक आहे.

५. महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएटी/२०१८/प्र.क्र.१२७/इमा-२ दि. २८/११/२०१८ अन्वये निविदाधारक/ठेकेदाराने निविदेसोबत निविदा मंजूरी व नंतर देयक अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निदर्शनास आल्यास याबाबत संपूर्ण जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील. सदर बाबत नगरपरिषद अधिकारी जबाबदार असणार नाही याची नोंद घ्यावी.

६. स्थायी निर्देश क्र.३६ मधील निदेशानुसार रक्कम रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर निविदेमध्ये सदस्यांच्या सहभाग नसल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ठ-अ) देणे बंधनकारक आहे.

७. एकदा निविदेमध्ये सहभाग घेतल्यानंतर निविदेच्या कोणत्याही स्तरावर निविदाकारास माघार घेता येणार नाही, तसे आढळल्यास महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२/दि. २९/०१/२०१९ नुसार सदर निविदाधारकाची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

८. याकामी महाराष्ट्र शासानचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णयक्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२ दि.१४/०१/२०१९ नुसार दोष दायित्व कालावधी लागू राहील.

९. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.१६/०२/२०२४ शासन निर्णयानुसार कंत्राटदाराची निविदा निम्नतम देकाराची ठरल्यास निविदा मंजूरी प्रक्रियेअंती कामाची सुरक्षा ठेव रक्कम जमा करण्यास कळविण्यात येईल व कंत्राटदाराने सुरक्षा ठेव रक्कम जमा केल्यावर कामावर कामाचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१०. कंत्राटदाराने मागील ५ वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढालबाबत **(टर्न ओव्हर)** देय असलेल्या वार्षीक किमंतीच्या कमीत कमी ७५% इतकी असल्याबाबतचे चार्टर्ड अकाउंटंट यांच्या सहीचे प्रमाणपत्र सादर करावे. (वार्षीक किमंत) = (कामाची एकूण किमंत) / (कामाचा कालावधी वर्षात)

११. सदर कामाकरिता खालील नमुद बाब अ, ब, व क नुसार काम पुर्ण केल्याचे किमान कार्यकारी अभियंता अथवा सक्षम दर्जाच्या अधिकाऱ्याचे स्वाक्षरी असलेले अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (मागील ५ वर्षात, कंत्राटदाराने त्याच स्वरुपाच्या तुल्यबळ किमतीच्या, पुर्ण केलेल्या कामाची किमान किंमत) त्यावर पडताळणीसाठी प्रमाणपत्र क्र. कामाचे अनुभव प्रमाणपत्र क्र. व संपर्काचे तपशील उपलब्ध असणे आवश्यक आहे.

देय कामांच्या किंमतीनुसार (प्रचलित दराने)

अ) तीन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजीत रक्कमेच्या ४०% पेक्षा कमी नसावी.

ब) दोन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजीत रक्कमेच्या ५०% पेक्षा कमी नसावी.

क) एक सारख्या पध्दतीची कामे ज्याची रक्कम किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या ८०% पेक्षा कमी नसावी.

१२. देय कामासाठी मागील ५ (पाच) वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाच्या आहेत त्याचे कमीत कमी परिमाण हे देयक कामातील बाबीच्या परिमाणाच्या ३०% असणे बंधनकारक आहे.

१३. रु.१००.०० लक्ष किंमतीच्या वरील सर्व कामांसाठी कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (**बीड कपॅसिटी**) निविदा रक्कमेइतकी अथवा त्यापेक्षा जास्त असणे बंधनकारक असुन, त्याबाबत चार्टर्ड अकाउंटंट यांच्या सहीचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

निविदा भरण्याची सक्षमता (बीड कपॅसिटी) $=(A\times N\times 2)-B$

जेथे A- गेल्या ५ (पाच) वर्षातील कमीत कमी वार्षीक उलाढाल (चालु दराने)

N - देय कामाचा कालावधी

B - हातातील कामांची किंमत (देय कामांच्या कालावधीतील)

१४. रु.१५०.०० लक्ष वरील रक्कमेच्या कामांसाठी मु.अ.सा.बां.वि. मुबंई यांचेकडील दि.२८/०६/२०१७ च्या परिपत्रकानुसार आवश्यक मशिनरी लागतील. सदरील मशिनरी/प्लांट स्वमालकीचे/भाडे तत्वावर असावेत. याबावत ॲग्रीमेंट/इनव्हॉइस च्या प्रती निविदेसोबत जोडावेत. तसेच आस्थापनेवरील तांत्रीक कर्मचारी यांची माहिती जोडावी.

१५. सदर ई-निविदेतील तांत्रिक लिफाफा मध्ये सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची (हार्ड कॉपी) एक साक्षांकित प्रत निविदेतील तांत्रिक लिफाफा उघडण्यापूर्वी नगरपरिषदेमध्ये सादर करावी.

१६. सदर कामाची साईट पाहणी संबंधित कुबनप अभियंत्यासह करुन, स्थळ पाहणी दाखला व जीपीएस फोटोसह ई-निविदा भरणे बंधनकारक आहे, त्याशिवाय निविदा मंजुर केली जाणार नाही.

१७. निविदाधारक हा सोलार उत्पादक कंपन्यांपैकी कोणत्याही एका कंपनीचा अधिकृत वितरक, डिलर अथवा चॅनेल पार्टनर असणे बंधनकारक आहे.

१८. करारनाम्यातील सर्व अटी शर्तीचे व नगरपालिका नियम व अधिनियम तसेच शासन निर्णय यांचे पालन करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

१९. प्राप्त निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा कोणत्याही कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवला आहे.

कुळगांव-बदलापूर नगरपरिषद कुळगांव

Digitally signed by
MARUTI PANDURANG GAIKWAD
Date: 28-04-2026 18:53:34

(मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापुर नगरपरिषद

Signature Not Verified
Digitally signed by Abhijit Anil Tamhane
Date: 2026.05.07 13:16:32 IST
Location: Maharashtra-MH